



अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड



आज वसुबारस

गाय आणि वासराच्या अंगी असलेली उदारता, प्रसन्नता आणि समृद्धी आपणास लाभो..!

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. ९ नोव्हेंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ४२ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८


सुरत-चेन्नई राष्ट्रीय हरित महामार्ग

# वाद पुन्हा पेटण्याची शक्यता; जमिनी सक्तीने ताब्यात घेण्याची तंबी

## २६० भूधारकांना ७७ कोटी वितरित; बाधितांनी नुकसान भरपाईचे प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

सुराज्य/सोलापूर

**केंद्र शासनाच्या भारतमाला परियोजनेअंतर्गत सुरत-चेन्नई हा राष्ट्रीय हरित महामार्ग सोलापूर जिल्ह्यातील बार्शी, दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट तालुक्यातून जाणाऱ्या मोबदालाच्याचा वाद पुन्हा पेटण्याची शक्यता आहे. कमी दर मिळत असल्याने जमीन संपदान करण्यात शेतकऱ्यांचा विरोध आहे. मात्र या विरोधाला न जुमानता शेतकऱ्यांनी संपादित जमिनीचा ताबा द्यावा जे शेतकरी ताबा देणार नाहीत, अशा शेतकऱ्यांच्या जमिनीचा ताबा राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ च्या कलम-३ ए मधील तरतुदीनुसार सक्तीने घेण्यात येईल, अशी तंबी दिल्याने शेतकऱ्यांमध्ये एकच खळबळ माजली आहे.**



सध्या या महामार्गासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे. मात्र दर कमी मिळत असल्याने शेतकरी जमिनी द्यायला विरोध करीत आहेत. दरम्यान, जिल्हा प्रशासनाने शेतकऱ्यांना संपादित जमिनीचा ताबा देण्याचे आवाहन केले आहे.सुरत-चेन्नई महामार्गासाठी बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना यापूर्वीच नुकसानभरपाई घेऊन जाण्याच्या नोटीसा देण्यात आल्या आहेत. नोटीस देऊन ६० दिवसांची मुदत संपली आहे. तरीही बाधित मिळकतधारकांनी अद्याप नुकसानभरपाईसाठी मागणी प्रस्ताव सादर केले नाहींत. आता नोटीस बजावल्यापासून ६० दिवसांमध्ये संपादित जमिनीचा कब्जा, ताबा सक्षम प्राधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांकडे द्यावा. अन्यथा सक्तीने ताबा घेण्यात येईल, असे पत्रकात म्हटले आहे. एकूण नुकसान भरपाई मागणी प्रस्ताव २६० प्राप्त झालेले आहेत. सर्व २६० नुकसान भरपाई प्राप्त मागणी प्रस्तावांची नुकसान भरपाई रक्कम अदा केली आहे. सदरच्या २६० भूधारकांना ७ नोव्हेंबरपर्यत एकूण एकंदर ७७ कोटी रूपये रक्कम अदा केले आहेत. बार्शी तालुक्यातील १६ गावांपैकी रातंजन, अलीपूर, कोळेगाव, हिंगणी (रा.), ५) नागोबाची वाडी, मानेगाव, वैराग, दडशिंगे, कव्हे, बळेवाडी, सर्जापूर, लक्षाचीवाडी, पानगाव, कासारवाड, सासुरे असे एकूण १५ गावातील बाधित गट धारकांना नोटीसा देण्यात आल्या आहेत. परंतु, बार्शी तालुक्यातील फक्त १३९ गट धारकांनी प्रस्ताव सादर केले आहेत.

### तत्काळ प्रस्ताव सादर करा : उपजिल्हाधिकारी

सूरत-चेन्नई राष्ट्रीय हरित महामार्गासाठी बार्शी, दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यतील शेतकऱ्यांच्या जमिनीचे संपादन करण्यात येत आहे. या महामार्गासाठी बाधित होणाऱ्या मिळकतधारकांनी उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. ११ सोलापूर यांच्या कार्यालयात नुकसान भरपाई मागणी प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन उपजिल्हाधिकारी तथा भूसंपादन क्र. ११ चे अधिकारी अभिजित पाटील यांनी केले आहे.

### ४१ गट धारकांनी केले प्रस्ताव सादर...

सूरत- चेन्नई या राष्ट्रीय हरित महामार्गासाठी अक्कलकोट तालुक्यातील १७ गावांपैकी उमरगे, चपळगाव, कोन्हाळी, बोरेगाव, नागोरे, नागणहळ्ळी, डोंबरजवळगे, मिरजगी, मैंदर्गी, चपळगाववाडी, दहिटणेवाडी, हसापूर, मुगळी, दुधनी, इटगे असे एकूण १५ गावातील बाधित गट धारकांना नोटिसा देण्यात आल्या आहेत. परंतु अक्कलकोट तालुक्यातील फक्त ४१ गट धारकांनी प्रस्ताव सादर केले आहेत.



### स्टोक्समुळे इंग्लंडचा १६० धावांनी विजय

पुणे : आयसीसी एकदिवसीय विश्वचषक २०२३ स्पर्धेतील ४०वा सामना बुधवारी पुण्यातील एमसीए स्टेडियमवर पार पडला. या सामन्यात इंग्लंड आणि नेदरलँड्स आमनसामने आले होते. इंग्लंडने या सामन्यात नेदरलँड्सचा १६० धावांनी पराभव केला. इंग्लंडचा कर्णधार जोस बटलरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. इंग्लंडने ५० षटकांत ९ बाद ३३९ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात नेदरलँड्सचा संघ ३७.२ षटकांत १७९ धावांवर गारद झाला. या पराभवासह विश्वचषकातून बाहेर पडणारा हा चौथा संघ ठरला आहे. इंग्लंड संघाने आपल्या शेवटच्या साखळी सामन्यात शानदार विजय संपादन केला. त्यांनी नेदरलँडचा १६० धावांनी पराभव केला.

## कार्तिकी एकादशी : शासकीय पूजेला कोणाला बोलवायचे हा निर्णय शासन करणार

पंढरपूर : विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या शासकीय पूजेला कोणाला बोलवायचे हा निर्णय शासन करणार असल्याचे गहिनीनाथ महाराज यांनी सांगितले. पंढरपुरातील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या शासकीय बैठकीप्रसंगी ते बोलत होते.



कार्तिकी वारीसाठी उपमुख्यमंत्र्यांना बोलवण्यासाठी आजच्या बैठकीत चर्चा होणार होती. सकल मराठा समाजाच्या तरुणांनी येऊन घोषणाबाजी करून आंदोलन केले. कार्तिक एकादशीच्या पूजेत कुठल्याही मुख्यमंत्र्यांना बोलावू नये, अशी मागणी केली. जर शासनाने पूजेसाठी उपमुख्यमंत्र्यांना बोलावले तर आम्ही त्यांच्या हस्ते पूजा होऊ देणार नाही. जे प्रशासकीय अधिकारी उपमुख्यमंत्र्यांना पूजेला बोलावतील त्यांच्या तोंडाला सकल मराठा समाजाच्यावतीने काळे फासले जाईल. जोपर्यंत आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, खासदार, आमदार यांना शासकीय कार्यक्रमास बंदी असेल, असे यावेळी मराठा समाजाच्यावतीने जाहीर करण्यात आले.

> शासकीय पूजेला कुणाला बोलवायचे हा निर्णय पूर्णपणे शासन घेणार आहे. त्यामुळे पूजेला कुणाला बोलायचे, आमच्या हातात नाही. आपला निरोप शासनापर्यंत पोहोचवायचे काम मी करतो.
>
> **– गहिनीनाथ महाराज**

> सकल मराठा समाजाचा विरोध डावलून जर उपमुख्यमंत्री पूजेला आले तर पंढरपूर येथील कायदा व सुव्यवस्थेची संपूर्णपणे जबाबदारी ही प्रशासनाची असेल.
>
> **– सकल मराठा समाज, पंढरपूर**

## दाम दुप्पट पैसे करून देतो म्हणून गुंतवणूकदारांना १ कोटीला गंडा

सुराज्य/सोलापूर

रियल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनीत गुंतवलेल्या पैसे दाम दुप्पट करून देतो असे म्हणून ३६५ गुंतवणूकदार ठेवीदारांना १ कोटींचा गंडा घातल्याप्रकरणी कंपनीच्या सर्व पदाधिकाऱ्यावर फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

घटनेची हकीकत अशी की,२०१२ कलकम रियल इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लिमिटेडकंपनी ही सोलापुरातील शुभराय टॉवर या ठिकाणी कार्यरत असून फिर्यादी संगीता राजेंद्र सलगर (वय-४०, रा.उमरगा) यांचा विश्वास संपादन करून कंपनीच्या पदाधिकाऱ्यांनी फिर्यादीसह त्यांच्या ओळखींचे लोक, नातेवाईक अशा ३६५ गुंतवणूकदाराकडून १ कोटी ३२ हजार ८५७ रुपये स्वीकारून ते दाम दुप्पट करून देतो असे म्हणून आमिष दाखवले.परंतु कंपनीने असे कोणतेही दाम दुप्पट पैसे न देता आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी कलकम रियल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनीचे मालक विष्णू दळवी, विजय सुपेकर, सुनील रघुनाथ वांद्रे, अरविंद वाघमारे, लक्ष्मण चंद्रकांत भोई, ज्ञानेश्वर साठे व त्यांचे सहकारी यांनी फसवणूक केली. फौजदार चावडी पोलीस ठाण्यात आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल झाला असून, अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक बनसवडे करत आहेत.

## कासारी घरफोडीतील आरोपीला नागरिकांनी पाठलाग करून पकडले

सुराज्य/सोलापूर

कासारी (ता.बार्शी) येथे विश्वंभर जाधव (वय-७०) या शेतकऱ्यांच्या घरात दिवसा चोरी करून दुचाकीवरून पळून जाताना गावकऱ्यांनी पाठलाग करून पकडले. झटापटीत चोरटा जखमी झाला. त्याला वैरागमध्ये प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

तानाजी संभाजी कचरे (वय-३५ शेळगाव) असे जखमी झालेल्या चोरट्याचे नाव आहे. तानाजी कचरे आणि त्याचे दोन साथीदार या तिघांनी मिळून येथील विश्वंभर जाधव यांच्या बंद घराचे कुलूप तोडून ३५ हजार रुपये चोरले होते. चोरी केल्यानंतर ते दुचाकी वरून पळून जात होते.

त्यावेळी गावकऱ्यांनी त्याचा पाठलाग करून एकाला पकडले. त्यावेळी झालेल्या झटापटीत चोरटा दुचाकीवरून पडून जखमी झाला होता. त्याला उपचारासाठी सोलापुरात दाखल केले.

## पोलीस निरीक्षक घुगे यांची तडकाफडकी बदली

### ड्रग्जप्रकरण भोवल्याची चर्चा

सुराज्य/मोहोळ

राज्यभर गाजत असलेल्या ड्रग्ज प्रकरणाचा तपास सुरू असताना अचानकपणे मंगळवारी रात्री मोहोळचे पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांची तडकाफडकी नियंत्रण कक्षात बदली केली. त्यांच्या जागी सुरेशकुमार राऊत यांची नियुक्ती केली.

मागील ८ महिन्यांपूर्वी पोलीस निरिक्षक विनोद घुगे यांनी मोहोळ पोलीस ठाण्याचा चार्ज घेतला होता. त्यांनी चार्ज घेतल्यापासून मोहोळ शहरात वाहतुकीला शिस्त लावण्याचा प्रयत्न केला होता. त्यांचा शहराच्या वाहतुकीवरचा वचक वाढला होता. चिंचोली काटी औद्योगिक वसाहतीत बंद असलेल्या कंपनीत मुबईचे अमली पदार्थ प्रतिबंध पथकाचे प्रमुख दया नाईक यांनी मफेड्रॉनचा मोठा साठा जप्त केला. त्यानंतर मोहोळ पोलिसांनी देवडी पाटीजवळ दोन घोडकेंना ड्रग्ज विकण्यासाठी आले असता अटक केली. त्यानंतर नाशिक पोलिसांनी तीन चार दिवसाच्या अंतराने चिचोली काटी औद्योगिक वसाहतीत दुसऱ्या कंपनीवर रेड केली व या ठिकणी मोठा जप्त केला.



अशा परिस्थितीत पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांची नियंत्रण कक्षात बदली होऊन सुरेश कुमार राऊत यांची नियुक्ती झाली त्यामुळे ड्रग्ज प्रकरण त्यांच्यावर शेकले असल्याची चर्चा मोहोळ तालुक्यात नागरीकांमध्ये सुरू आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



दिवाळीचे तोरण लावायचे की ओले कपडे वाळवायचे?

| कल्याण |
| --- |
| 148-31-489 |

| मुंबई |
| --- |
| 158-41-137 |

# सोलापूरसह जिल्ह्यात पावसाची हजेरी...

- रब्बी पिकांची वाढ होण्यास पोषक, द्राक्ष बागांना धोका

सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहर व जिल्ह्यातील बहुतांशी भागात बुधवारी पहाटे मध्यम व हलक्या स्वरूपाच्या पावसाने हजेरी लावली. शहर व परिसरात २८ मिलीमीटर पावसाची नोंद झाली असून ग्रामीण भागात पडलेल्या पावसामुळे रब्बी ज्वारीसह इतर पिकांच्या वाढीसाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे. मात्र काढणीला आलेल्या सोयाबीन पिकासह द्राक्ष बागांसाठी हा पाऊस आणि ढगाळ हवामान हानीकारक असल्याचे जाणकारांनी सांगितले.रब्बी क्षेत्रासाठी पावसाची आवश्यकता होती.पेरण्या केलेल्या शेतकऱ्यांना तसेच पेरण्या न केलेल्या शेतकऱ्यांनाही पावसाची आशा लागून होती.गुरूवारी दिवसभर सर्वत्र पावसाळी वातावरण होते तर सायंकाळी अनेक भागात पावसाची रिपरिप होती.

बार्शी तालुक्यात पाऊस नसला तरी तेथे गेल्या तीन दिवसांपासून ढगाळ हवामान जाणवत असल्यामुळे त्या भागातील सोयाबीन उत्पादक शेतक-यांवर संकटाची टांगती तलवार आहे. पाऊस पडल्यास सध्या काढणीला आलेल्या सोयाबीनचे मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे. जिल्ह्यात सरलेल्या खरीप हंगामात ४८ हजार ६८८ हेक्टर क्षेत्रात सोयाबीनचा पेरा झाला होता. त्यापैकी सर्वाधिक ३५ हजार ४०८ हेक्टर क्षेत्र एकट्या बार्शी तालुक्यातील आहे. अक्कलकोटमध्ये पाच हजार २४७ हेक्टर क्षेत्रात सोयाबीनची लागवड झाली होती. परंतु पावसाने पुरेशी साथ न दिल्यामुळे सोयाबीनची अपेक्षित वाढ झाली नाही. तरीही मोठ्या कष्टाने वाचविलेले सोयाबीन पिकांची काढणी होत असताना पहाटे पाऊस झाला. त्यात सोयाबीनची हानी झाली.




गेल्या तीन दिवसांपासून सोलापूर परिसरात ढगाळ वातावरण असताना पहाटे कमीजास्त प्रमाणावर पावसाने हजेरी लावली. शहरात सकाळ उजाडेपर्यंत पावसाच्या सरी कोसळत होत्या.उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, मोहोळ, मंगळवेढा आदी तालुक्यांमध्ये हलक्या व मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. या पावसामुळे ज्वारीसह रब्बी हंगामातील अन्य पिकांसाठी पोषक ठरणारा असल्याचे मानले जाते. तूर पिकासाठीही हा पाऊस लाभदायक असल्याचे सांगितले जाते. जिल्ह्यात यंदा समाधानकारक पाऊसमानाअभावी दुष्काळसदृश्य परिस्थिती ओढवली असून खरीप पिकांच्या हंगामाला मोठा फटका बसला आहे. रब्बी हंगामात पेरण्या अपूर्णच आहेत. अनेक भागात पेरलेल्या पिकांची पावसाअभावी उगवण झाली नाही. मात्र बुधवारी पडलेल्या पावसामुळे उर्वरीत रब्बी पेरण्या होतील. मंगळवेढा भागात ज्वारीसाठी पोषक हवामान तयार होत असल्यामुळे तेथील शेतकरी आनंदित झाला आहे. पिकांच्या उगवणीसाठी पोषक वातावरण निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

तथापि, द्राक्षबागांसाठी हा पाऊस आणि ढगाळ हवामान हानीकारक ठरला आहे. द्राक्ष छाटणी झालेल्या बागा सध्या फुलोरा स्वरूपात दिसत आहेत. परंतु पावसाच्या तडाख्यामुळे गळ होऊ शकते. त्यामुळे औषधांच्या फवारणीचा खर्च वाढला आहे.